# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXVI | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2024 SEPTEMBER | No. 08


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

नीतिसूत्रे ९२:१-१०

१. हे देवा, मजवर दया कर, कारण मनुष्यें माझा पिच्छा पुरवीत आहेत; दिवसभर मजशी लढून त्यांनी माझा छळ मांडिला आहे.

२. दिवसभर माझे शत्रु माझा पिच्छा पुरवीत आहेत; मजशी मगरुरीनें लढणारे बहुत आहेत.

३. मला भीति वाटेल तेव्हा मी तुजवर भरवसा टाकीन.

४. देवाच्या साहाय्याने मी त्याच्या वचनाची प्रशंसा करीन; देवावर मी भरवसा ठेविला आहे, मी भिणार नाही; कोण माझें काय करणार?

५. दिवसभर ते माझ्या शब्दांचा विपर्यास करितात; त्यांचे सर्व विचार मजविरुद्ध माझ्या वाईटासाठी असतात.

६. ते एकत्र मिळतात, तें टपून राहतात; ते माझा जीव घ्यावयास पाहतात.

७, इतकी त्यांची दुष्टाई असून ते सुटतील काय? हे देवा, लोकांस क्रोधाने पाडून टाक.

८. मी ज्या ज्या ठिकाणी भटकलो ती तूं मोजिली आहेत; माझी आसवें तू आपल्या बुधलीत भरुन ठेविली आहेत; तुझ्या वहीत ती नमूद झाली नाहीत काय?

९. मी धावा करीन त्या दिवशी माझे वैरी मागे फिरतील; देव माझ्या पक्षाचा आहे हे मी जाणतो.

१०. देवाच्या साहाय्याने मी त्याच्या वचनाची प्रशंसा करीन; परमेश्वराच्या साहाय्याने त्याच्या वचनाची प्रशंसा करीन.



# तुमच्या शापाला आर्शीवादात बदला

## TURN YOUR CURSES INTO BLESSINGS!

*पाळक, एस. सॅम सेल्वाराज द्वारा*

**“...जीवन आणि मरण, आशीर्वाद आणि शाप ही तुजपुढे ठेविली आहेत; तूं जीवन निवडून घे म्हणजे तूं व तुझा वंश जीवंत राहील; आपला देव परमेश्वर याजवर प्रेम कर; त्याची वाणी ऐक व त्यास धरुन राहा, कारण त्यांतच तुझे जीवन आहे, त्यातच तुझी आयुर्वृद्धि आहे;...”** (अनुवाद ३०:१९-२०)

सर्व मनुष्यांत एक मूलभूत आणि सर्वसामान्य समस्या पाहवयास मिळते ती म्हणजे आपण सर्व चुकीच्या मार्गात गेलो आहोत. आपण कदाचीत खून केला नसेल; व्यभिचार किंवा चोरी केली नसेल, परंतु आपण सर्वांनी एक विशिष्ट गोष्ट केली. आपण सर्व आपआपल्या मार्गाने गेलो आहोत, देवाकडे आपली पाठ फिरवून त्याज विरुद्ध पाप केले आहे. हिब्रु भाषेत या वर्तनाला **"AVON"** ज्याचे इंग्रजीत **"Inquity"** असे भाषांतर केले आहे. त्याचे **"Adamant"** – हट्टी – निग्रही असे स्पष्टिकरण देता येईल. हा आपल्यामध्ये असणारा स्वभाव गुण देवा विरुद्ध आहे. **"Inquity"** आणि **"Adamant"** हे इंग्रजी शब्द हिब्रु **"AVON"** या शब्दाचा पूर्ण अर्थ विदीत करीत नाहित. **"AVON"** या शब्दात आपल्या दुष्कर्म आणि हट्टी-निग्रही विचारांचा परिणाम समाविष्ठ आहे.

(...पान ३ वर)


एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश



यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

Every day – From 2.00 A.M.

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

## ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


HON. EDITOR-IN-CHIEF

Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.

HON. MANAGING EDITOR

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

GENERAL MANAGER

Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.

ADMINISTRATION

Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)

EDITORIAL BOARD

Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran



EDITOR, PUBLISHER & PRINTER

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers



10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858

E.MAIL

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL

Echo of His Call


**"ज्याने आमच्या दैन्यावस्थेत आमची आठवण केली त्याचे; कारण त्याची दया सनातन आहे." (स्तोत्र १३६:२३)**

ख्रिस्त येशूमधील प्रिय बंधुंनो आणि बहिणीनों!

आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या अद्‌भूत नामात तुम्हाला शुभेच्छा. आम्ही तुमच्या कल्याणाकरीता आग्रहाने प्रार्थना करीतो. देवाने आमच्या ९ ते ११ ऑगस्ट या दिवसातील ५६व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमांसहित इतर सर्व कार्यक्रम आशीर्वादीत केले, ज्या मध्ये त्याचे नाम गौरविले गेले.



*बहीण जेनोवा अेलँगोवान*

आमच्या मुख्य मंडळींतील जवळच्या सहकारी, बहिण जेनोवा अेलँगोवान, पास्टर ई. कॅमल सॅमसन यांच्या माता यांनी २९ जुलै २०२४ रोजी गौरवात प्रवेश केला. त्या मुख्य मंडळीत परिश्रमपूर्वक कार्य करणाऱ्या समर्पित अशा होत्या. त्यांच्या कुटुंबियांकरिता कृपया प्रार्थना करा.

भारताच्या दक्षिण-पश्चिम भागातील केरळमधील वायनाड या ठीकाणी पूरामुळे घडलेल्या भूस्खलनामुळे जी भयंकर दुर्घटना घडली. त्यामुळे आम्ही अतिशय दु:खीत आहोत. अनेकांना त्यांचे प्रियजन आणि संसार गमवावे लागले. आम्ही आमच्या जगभरातील मित्रांना त्यांच्या पुर्नवसनासाठी मदत करावी अशी अति नम्रतापूर्वक विनंती करीत आहोत.

केरळ हे भारतातील पहिले राज्य आहे; ज्यात प्रभु येशू ख्रिस्ताचा शिष्य संत थोमा याने इ.स. ५२ मध्ये प्रथम पाऊल टाकले. याच ठिकाणी आमचे मल्यालम सहसंपादक, सुवार्तिक बेंजामिन मोझेस, आणि त्यांचे सहाय्यक बंधु मोहन कुमार, आणि आमच्या इंग्रजी मासिकाच्या सहसंपादिका बहिण साजीनी चेरियन राहतात. संत थोमा, यांचा चेन्नई येथे रक्तसाक्षी म्हणून मृत्यु झाला, याच शहरात आमच्या **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्यालय आहे.



*सुवार्तिक बेंजामिन मोझेस*



*बंधु मोहन कुमार*



*बहिण साजीनी चेरियन*

तुम्हाला हे माहित आहेच, आम्ही **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्याच्या अन्तर्गत 'ग्लोबल व्हिजन फार युथ अॅण्ड किडस् केअर' हा विशेष विभाग सुरु केलेला आहे. या द्वारे जगभरातील **एको ऑफ हिज कॉल सेवा** कार्यातील सभासद, त्यांच्या स्थानिक वेळेनुसार दररोज रात्री १० वाजता प्रार्थनेकरिता एकत्र येऊन "आमच्या प्रभु देवा, जगभरातील तरुण मुले-मुली आणि लेकरें यांचे रक्षण कर, प्रभु येशू ख्रिस्ताच्या नामात मागतो, आमेन! हि संक्षिप्त यद्यपी शक्ति झाली. प्रार्थना करीतात.


**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) • BIBLECOR - Postal Courses (3 languages) • YouTube Ministry • Online Courses • Theological Correspondence Courses (2 languages) • Church Planting • Nehemiah Bible Colleges • Gospel Printing Press • Great Commission Partners • St. Paul's Matriculation School • Crusades • Community Development

तुम्ही कोणत्याही ठिकाणी असाल, आम्ही तुम्हाला या प्रार्थनेत सहभागी होण्यासाठी आमंत्रीत करीत आहोत.

या चळवळीने आमच्या मुख्य मंडळीत आणि **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल** मध्ये विलक्षण पुनरुज्जीवन घडून आले आणि ते विशेषकरुन तरुणांमध्ये आम्हाला जगभरातील आमच्या मित्रांकडून सतत अनेक साक्ष पाठविण्यात येत आहेत. या तरुणांकरीता ११ ऑगस्ट रोजी आम्ही आमच्या मुख्य मंडळीत एक सभा घेतली. सर्व मान महिमा आणि गौरव, आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताला.



***A conference held in the Main Church***

आम्ही उत्साहाने आणि जबाबदारीने पुढे-पुढे जात असताना, पुष्कळशा आवाहानांना सामोरे जावे लागत आहे. सैतानाकडून आमच्या नानाविध सेवेतील सेवकांच्या कुटुंबातील सभासदांना शारिरीक, आर्थिक दुःख देवून लक्ष्य करीत आहे. **एको ऑफ हिज कॉल** सेवाकार्यात सध्या आम्हाला महत्वपूर्ण असा आर्थिक ताण जाणवत आहे आणि त्यासाठी आम्ही तुम्हाला प्रार्थना करण्यास विनंती करीत आहोत. दररोज रात्री १० वाजता करण्यात येत असलेल्या प्रार्थनेत कृपया जगभरातील **एको ऑफ हिज कॉल**च्या सर्व कामकरी वर्ग आणि पुढाऱ्यांच्या कल्याणाकरीता देखील प्रार्थना करण्यास विसरू नका.

जगभरातील मंडळ्यांमधील पंथीय अडखळण नष्ट व्हावेत याकरिता प्रार्थना करून परिश्रम करणे हे आमचे ध्येय आहे.

प्रियांनो आम्ही तुम्हाला आमच्या हृदया जवळ धरीतो आणि तुमच्याशी अतिशय निकटची सहभागीता साधू इच्छितो. आमच्याशी संपर्क साधा किंवा यूट्युब वरील दररोज प्रसारित होणारा पाच मिनिटांचा संदेश ऐका.

देव तुम्हा सर्वांना विपुल आशीर्वाद देवो.

प्रिती आणि कृतज्ञते सहित,

ख्रिस्त येशू मध्ये तुमचे दास.

**ॲलेक्स सॅमसन सॅम**
**पास्टर एस्. सॅम सेल्व राज**

(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : sam@echoofhiscall.org

## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी मासिकाच्या वाचकांनो - लक्ष द्या

**एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत केले जात आहेत. संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक (+९१)९८४१०७१८५८, आणि (९१)९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

(पान १ वरुन...)

उदा. कईनाने त्याचा भाऊ हाबेल याचा जेव्हा खून केला; तो देवाला म्हणाला; **''हा माझा दंड मला सोसवणार नाही इतका भारी आहे.''** (उत्पत्ति ४:१३) या संदर्भात **"AVON"** हा हिब्रू शब्द 'शिक्षा' या अर्थी वापरण्यात आलेला आहे. हा काईनाचा अपराध-दुष्कृत्य आणि शिक्षा सुचविते विलापगीत ४:६ आणि १३ ही वचने मूळ हिब्रू शब्दाचा अर्थ सुचित करितात.

**''तिच्या (सदोमाच्या) पापापेक्षा माझ्या लोकांच्या कन्येचे दुष्कर्म अधिक झाले आहे.''** (विलापगीत ४:६)

**''तिच्या संदेष्ट्यांच्या पातकांमुळे व तिच्या याजकांच्या दुष्कर्मामुळे हे झाले; त्यांनी तिच्या वस्तीत धार्मिकांचा रक्तपात केला आहे.''** (विलापगीत ४:१३)

आपल्याला आज देवाचे अनेक शाप अनेक कुटुंबांवर असलेले पाहवयास मिळतात. ख्रिस्ती घरामध्ये देखील संघर्ष-भांडणे, गैरसमज आणि गोंधळ आहे. मी आता काही शापांची रुपरेषा देणार आहे, जी देवाने त्यांच्या आज्ञा मोडणाऱ्या लेकरांवर उच्चारिल्या. (अनुवाद २८:२०-२०, २७-२८.

अनुवाद २८:२० **'तूं परमेश्वराचा त्याग करुन दुष्कर्म केल्यामुळे ज्या ज्या कामास हात घालशील त्यांत परमेश्वर तुला शाप देईल, तुला घाबरे करील, तुला शासन करील, ते इतके की तुझा नाश होऊन तू त्वरित नष्ट होशील.'**

अनुवाद २८:२१ **'जो देश वतन करुन घ्यावयास तूं जात आहेस तेथे तूं समूळ नष्ट होईपर्यंत मरी तुला बिलगून राहील असे परमेश्वर करील.'**

अनुवाद २८:२२ **'क्षयरोग, ज्वर, दाह, जळजळाट, तरवार, झळई, भेरड ह्यांच्या योगे परमेश्वर तुझा संहार करील आणि तुझा समूळ नाश होईपर्यंत ही तुझा पिच्छा पुरविल.'**

अनुवाद २८:२७ **'परमेश्वर तुला मिसर देशांतील गळवे, मूळव्याध, खवडे व खरुज यांची पीडा लावील की तूं बरा व्हावयाचा नाहीस.'**

अनुवाद २८:२८ **'परमेश्वर तुला अंधळा करील आणि तुझे मन अतिशय घाबरेल.'**

## (I) शापाची चिन्हे/लक्षणे

शापांच्या अस्तित्वाचा शोध घेत असताना, अनेक प्रकटीकरणे लक्षात येतात - स्पष्ट होतात.

### १) मानसिक खिन्नता :-

ज्या व्यक्ति त्यांच्या जीवनातील अपयश आणि संकटे यांच्या ओझ्याखाली असतात. अशा व्यक्ति गंभीर, अनाकलनीय अशा मानसिक खिन्नतेने आच्छादिले जातात. हा भावनिक भार त्यांना त्यांच्या नेहमीचे व्यवहार करण्यास असमर्थ करतात आणि त्यांना अनियमित अवस्थेत नेतात. शिवाय काही जण स्वत:च्या काल्पनिक दृष्यात प्रत्यक्षात नसलेल्या गोष्टि ग्राह्य समजुन त्याच्या झगडण्यात स्वत:ला त्रास करुन घेतात

### २) आळशीपणा/आळस-

कार्यक्षमता आणि कार्य वाढविण्याची भरपूर संधि उपलब्ध असताना देखील काहिजण आळस अवलंबीतात ते त्यांची निष्क्रीयता त्याच्या जीवनात घडून आलेली विशिष्ट घटना, अनैसर्गिक आप अशा बाह्य स्थितीवर लादतात.

### ३) विशिष्ट अनुवंशिक आजार-

काही कुटुंबात, पूर्वाजीत भिन्नता दर्शविणारा आजार किंवा अनुवंशिक वादाचा परंपरेने चालत असलेला विषय, एक प्रकारचा वंशाचा नमुना तयार होतो.

### ४) वारंवार झालेला गर्भपात आणि वांझपणा-

लागून असलेल्या शेताच्या मशागतीसाठी दोनहि बाजूनी पेरणी आणि कापणी करीता केलेल्या बारीक-सारीक तयारीतील धक्कादायक विरोधभास उत्पन्न होतो. सारख्याच स्थितीत आणि मशागतीची सारखीच पद्धती वापरली असताना देखील एका शेतात विपुल पिक येते, तर दुसरे नापीक रहाते.

त्याचप्रमाणे, काही स्त्रियांची प्रकृती उत्तम असून देखील ज्याचे स्पष्टिकरण देता येत नाहि. अशा गर्भपातास सामोरे जावे लागते. काहिना कोणतही कारण नसताना गर्भधारणास धडपडावे लागते, तर कांही प्रकृति स्वास्थ ठिक नसताना किंवा अनुवंशिक समस्या असताना देखील बालकास जन्म देतात.

### ५) विवाहास विलंब आणि विवाह मोडणे-

विवाहास विलंब लागल्याचा विषय आणि विवाह मोडल्यामुळे कांहिजणांना अतिशय दु:ख होते. उत्तम प्रयत्न करुन देखील कांहिजण अविववाहित रहात असताना काहि जोडपी एकमेकांशी जुळत नसल्याकारणामुळे घटस्फोटाच्या निर्णयापर्यंत येतात. या सहनशक्तीच्या अभावामुळे आणि कायदेशीर मध्यस्थी स्विकारल्यामुळे त्यांची वैयक्तिक समस्या आणि तत्वहिन अशा वकीलाच्या द्वारे आर्थिक पिळवणूक होते.

### ६) नित्याची गरिबी आणि अपयश-

नित्याची गरिबी आणि सतत येणारे अपयश यामुळे काही जणांना मानसिक दु:ख होते आणि ते स्वत:स निराशेत आणि कठीण परिस्थितीच्या जाळ्यात सापडतात. हि दिर्घावस्थेतील स्थिती त्यांना जीवनात काही अर्थ नाहि असे वाटू लागून आत्महत्या करण्याचे विचार मनात येतात. काहि दुर्देवाने जीवनात सारखे अपघात घडतात.

## II मनावजातीवर शापाचा कसा परिणाम झाला?

नीतिसुत्रे २६:२ प्रमाणे, "...**निष्कारण दिलेला शाप कोठेच ठरत नाही.**"

हि चिन्हे प्रकर्षाने शापाचे अस्थित्व दर्शविणारी ठरतात, त्या व्यक्तिच्या जीवनात दु:ख आणि प्रतिकूल परिस्थिती कथा विणतात.

### १) देवाच्या आज्ञाभंगा मधून उघड होणारे शाप-

आपले पूर्वज आदाम आणि हवा हे एदेन बागेत असताना देवाच्या अवकृपेमुळे मानव जातीवर शाप

देवाचा शाप मानव जातीच्या अस्तीत्वाच्या अगदी सुरुवातीपासून आपले पूर्वज आदाम आणि हव्वा यांच्यावरील एदेन बागेतील अवकृपेमुळे उपस्थित होता. सुरुवातीस आशीर्वाद दिला असताना देखील केवळ त्यांच्या आज्ञा न पाळल्यामुळे मानवी जीवनात शापाची सुरुवात झाली.

त्यांना बागेतील एका विशिष्ट झाडाचे

(...पान ६ वर)

NEHEMIAH BIBLE
RESIDENTIAL / EVENING COLLEGE,
Velachery / Chepauk & Santhoshapuram, Chennai.
Medium : Hindi / Tamil
Recognised by International Christian Leaders & Senior Pastors for the past 54 years
Qualification : 10th Standard & above
Diploma in Theology
Rush for Admission!
Contact : The Chairman, Nehemiah Bible College.
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
★ ONLINE CLASSES ARE AVAILABLE ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ सप्टेंबर ते १८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ सप्टेंबर:** आमचे १६ भाषांमध्ये प्रसिद्ध होणारे मासिक आमच्या मुद्रणालयात छापून ते मिशनक्षेत्रांना पाठविणे शक्य होऊ दिले.

**२० सप्टेंबर:** **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनल वरून दररोज प्रसारित हेत असलेल्या संदेशा बाबतीत साक्षी प्राप्त होत आहेत.

**२१ सप्टेंबर:** आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल, नहेम्या बायबल कॉलेज आणि पत्रव्यवहारा** द्वारे करण्यात येत असलेल्या अभ्याक्रमावरील आशीर्वादा बद्दल.

**२२ सप्टेंबर:** **एको ऑफ हिज कॉल** मासिक सेवेकरिता समर्पित सहसंपादक देऊन मासिक सेवा आशीर्वादीत करीत असल्याबद्दल.

**२३ सप्टेंबर:** मुख्य मंडळीत आणि शाखा मंडळ्यातील रविवारच्या सर्व उपासनांमधील देवाच्या सामर्थ्यशाली वचना बद्दल.

**२४ सप्टेंबर:** कार्यक्षम कर्मचाऱ्यांद्वारे सतत कार्यारत असलेल्या शुभवर्तमान मुद्रणाल्याबद्दल.

**२५ सप्टेंबर:** ९ ऑगस्ट २०२४ रोजी **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्याने ५६व्या वर्षात पदार्पण केले.

**२६ सप्टेंबर:** आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार यांच्या वर असलेल्या देवाच्या दयेबद्दल.

**२७ सप्टेंबर:** पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येत असलेल्या **बायबल अभ्यासक्रम व थियॉलॉजीकल अभ्यासक्रमा**तील वाढीबद्दल.

**२८ सप्टेंबर:** वरिष्ठ पाळक आणि त्यांच्या बहुविविध सेवा कार्याच्या माध्यद्वारे होत असलेल्या सुवार्ता प्रसाराबद्दल.

**२९ सप्टेंबर:** **एको ऑफ हिज कॉल** सेवा आणि सेवक व त्यांच्या कुटुंबांना सुरक्षित ठेवित असल्याबद्दल.

**३० सप्टेंबर:** मंडळीत नवीन विश्वासणाऱ्यांची भर घालून आशीर्वादीत केले.

**०१ ऑक्टोबर:** मिशन क्षेत्रातील सेवकांच्या समर्पितपणा बद्दल.

**०२ ऑक्टोबर:** आमचे वरिष्ठ पाळक, पास्टर एस्. सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबाला दैवी सुरक्षा पुरविल्याबद्दल.

**०३ ऑक्टोबर:** चालू शैक्षणीक वर्षातील २ऱ्या सत्रात **नहेम्या कॉलेज**ला प्रवेश करण्यास आशीर्वाद दिला.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०४ ऑक्टोबर:** प्रत्येक दारुच्या व्यसनाधीन असलेल्या आणि दुष्कर्म करण्याची त्यांनी पच्छाताप करावा यासाठी भेट घेता यावी.

**०५ ऑक्टोबर:** जगातील सर्व स्त्रिया आणि लेकरांच्या सुरक्षितते करीता.

**०६ ऑक्टोबर:** तरुणांकरिता आणि **एको ऑफ हिज कॉल**च्या बाह्य सुवार्ता प्रसार कार्या करिता.

**०७ ऑक्टोबर:** आमचे वरिष्ठ पाळक, पास्टर एस्. सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबाच्या उत्तम प्रकृति स्वास्था करिता.

**०८ ऑक्टोबर:** संपर्कात न आलेल्या भारतीयांपर्यंत पोहचणे शक्य व्हावे.

**०९ ऑक्टोबर:** सिंहला भाषिक मासिकाच्या संघातील बहिण मंजुलाच्या प्रकृति स्वास्थाकरिता.

**१० ऑक्टोबर:** या पृथ्वीतलावर त्याच्या राज्याच्या उभारणीकरिता स्पष्ट दर्शन द्यावे.

**११ ऑक्टोबर:** दक्षिण भारतातील केरळ राज्यातील वायनाड शहरातील भूस्खलनामुळे झालेली परिस्थिती पूर्वपदावर यावी, जन जीवन सुरळीत व्हावे.

**१२ ऑक्टोबर:** आमचे सेवेतील भागीदर, सर्व राज्य समन्वयक व त्यांच्या कुटुंबाकरीता.

**१३ ऑक्टोबर:** सर्व देशांत एकता आणि शांतता असावी.

**१४ ऑक्टोबर:** शुभवर्तमान साहित्य छापणाऱ्या मुद्रणालयावरील आशीर्वादासाठी.

**१५ ऑक्टोबर:** आमच्या सेवाकार्याच्या विस्तारासाठी आणि जागतीक सुवार्ता प्रसार कार्यासाठी.

**१६ ऑक्टोबर:** जगातील वेगवेगळ्या विभागातील आर्थिक मंदि संपुष्टात यावी.

**१७ ऑक्टोबर:** पददलितांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा व्हावी.

**१८ ऑक्टोबर:** सर्व देशांना देवाचे भय असणारे पुढारी प्राप्त व्हावेत.

(पान ४ वरुन)

फळ सोडून वाटेल त्या झाडाचे फळ यथेच्छ खाण्याची परवानगी होती. तथापी सैतानाच्या सल्याच्या प्रभावाखाली येऊन त्यांनी देवाने मना केलेले फळ खाल्ले. आदामाच्या या आज्ञेच्या उल्लंघनामुळे त्यांच्या वर शाप आला. याविषयी उत्पत्ति २.१५ ते ३.२४ वचनांत वाचावयास मिळते.

येशू ख्रिस्त मानवजातीचा उद्धारक-तारणारा आहे असे जगाला जाहिर करिते. त्याचा जन्म, मृत्यु आणि पुन:जीवीत होणे या घटना ऐतिहासिक दस्तऐवज आहेत. येशू ख्रिस्ताद्वारे, आम्हाला आमच्या पापांची क्षमा मिळते आणि लोकांनी त्याची लेकरे होण्यासाठी त्याचा स्विकार करावा. असा संदेश देतो. प्रथम त्याने देवाचे राज्य आणि त्याची धार्मिकता मिळविण्याची खटपट करावी, त्यानंतर जगीक आशीर्वाद येतील. आपण धार्मिकतेचे जीवन जगण्या विषयीचे आणि वेगवेगळ्या प्रकारचे देवाला मान्य नसणारे जीवन जगू नये असे शिक्षण देतो. लाखो लोक हा दैवी संदेश ऐकून देखील अगदी थोडके लोक ते स्विकारतात, येशू ख्रिस्ताचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकार करितात, पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नामात बाप्तिस्मा घेतात. आणि पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने चालतात.

ख्रिस्तीजनांना आम्ही सांगतो की, त्यांनी ख्रिस्ताच्या शिकवणीला धरुन रहावे, त्याचा मार्गअनुसरावा आणि त्याची सेवा करावी. तुम्ही जरी ऐकणार, तरी बहुतेकदा शिक्षण आचारण्यात आणण्यास मन द्विधा अवस्थेत असते. उपासना मंदीर पविज जागा आहे. त्यामध्ये प्रवेश केल्यावर आराधन महत्त्वाची असते. उपासना मंदीरात आरधन करण्यावर मनाची तयारी करुन आणि अंतस्य अशुद्ध विचार आणि हेतू दूर ठेवून प्रवेश करणे महत्त्वाचे आहे. आराधनेत व्यतय येऊ नये, व लक्ष विकेंद्रीत होऊ नये यासाठी मोबाईल बंद ठेवा.

## उपासना मंदीरातील वर्तणूक आणि पेहराव :-

कृपया मर्यादेशील, सलज्ज आणि साजेसा असा पोशाख परिधान करा, दुसऱ्यांच्या अविचारास चेतावणी मिळेल असे पोशाख परिधान करणे टाळा.

अयोग्य संबंधाकडे नेतील अशा कृति हावभाव करण्यापासून स्वत:स आवरा.

पुरुषशंनी स्वत:चे केस स्त्रियांसारखे दिसतील इतके वाढवू नये, आणि स्त्रियांनी पुरुषांसारखी केशभुषा करु नये असा सल्ला देत आहोत.

उपासनांसाठी वेळेवर हजर राहून व शेवट पर्यंत उपस्थित राहण्याने आराधनेस आदर व्यक्त करा.

या कृति देवाला संतोषविणाऱ्या आहेत.

## संदेशाप्रति प्रवृत्ति :-

ज्यांना सौम्य जीवनशैली मान्य असणाऱ्या मंडळ्या आवडतात त्यांना असे शिक्षण आवडणार नाही.

ते संख्येने मोठ्या असणाऱ्या मंडळ्या, ज्यामध्ये त्यांच्याकडे कोणाचेहि लक्ष नसणार आणि त्यांना वाटेल तसे वागता येईल अशा मंडळ्याच्या शोधात असतात.

## धार्मिकतेपासून दूर जाण्याचा परिणाम :-

नैतिक मार्गदर्शक सुचनांच्या विरुद्ध जीवन जगण्यामुळे देव त्याचा असंतोष किंवा त्याची नाराजी कशी रोखू शकतो असा प्रश्न निर्माण होतो.

या फारकतीचा परिणाम पुष्कळशा विश्वासातील पुढाऱ्यांत दूर दृष्टिचा अभाव, चमत्कारीक घटना घडून येणे आणि विश्वसनिय आत्मिक सामना करावा लागतो. पुष्कळशा स्वत:स धार्मिक म्हणविणाऱ्या पुढाऱ्यांना खऱ्या तारणाचा अभाव जाणवतो.

मंडळ्यांतील सध्याची स्थिति दैवी शिक्षेचा परिणाम दर्शविते.

२) स्वत:वर ओढून घेतलेले शाप:-

नीतिसूत्रे ६:२ **"तूं आपल्या तोंडच्या वचनाला गुंतला आहेस..."** हे वचन स्वत: उच्चारिलेल्या शब्दांचा प्रभाव स्पष्ट करते.

दिर्घ आयुष्य जगण्याची इच्छा नाहि असे जाहिरकरणे किंवा आत्महत्या करण्याचा गंभीर विचार करणे. याचा दूरगामी विपरित घडू शकतो, मग सहज किंवा इतरांना घाबरविण्यासाठी जरी केला असेल तरी देखील.

अनेक जणांनी असे वक्तव्य केल्यानंतर दुर्देवाने त्यांचा मृत्यु झाला.

काहि कुटुंबांमध्ये कदाचीत पती त्यांच्या पत्नीच्या स्वयपांकावर टिका करतील इतपर्यंत कि तीच्या स्वयंपाकाचा दर्जा इतका वाईट आहे कि ते सेवन केल्याने त्यांचा मृत्यु होईल. अशा पद्धतीने बोलणाऱ्या व्यक्ति या स्वत:च्या जीवनाविषयीची अपेक्षा निश्चित करतात हे ओळखणे गरजेचे आहे. अशाच प्रकारे, काहि पालक त्यांच्या लेकरांची शेजारच्या मुलांशी अयोग्य प्रकारे तुलना करुन दु:ख देणारे शब्द वापरुन त्यांचे महत्त्व कमी करतात. हि अपायकारक वागणूक त्यांच्या लेकराचे स्वत:विषयीच्या आत्मविश्वासातच केवळ नाहि तर संपूर्ण जीवनात नकारात्मक परिणाम घडवू शकतो.

प्रेषित पेत्र याला देखील त्याच्या जीवनात अशीच परिस्थितीला सामोरे जावे लागले. हे मार्क १४:६६-७२ या वचनात वाचावयास मिळते. मुख्य याजकाच्या वाड्यात उभा असताना त्याने येशू बरोबरच्या असलेल्या त्याचा सहवास नाकारला. त्याच्या शेवटच्या नकाराच्या वेळेस, तर त्याने शापोच्चार केला आणि शपथ घेतली. त्याच्या या अविवेकी, बेपर्वा वागणूकांचा परिणाम स्वत:वर शाप ओढवून घेण्यात झाला.

त्यानंतर तीन दिवसांनी, स्त्रिया ज्या येशूच्या कबरेकडे गेल्या होत्या, एक प्रकाश टाकणारा क्षण आला, देव दूत त्यांना भेटला व त्यांना सुचना केली की त्यांनी जाऊन शिष्यांना आणि पेत्राला येशू जीवीत झाला आहे आणि त्यांना गालिलात भेटणार आहे हे सांगावे (मार्क २७:२२,२५) स्वत: उच्चारिलेल्या शब्दांमुळे, यहुदीयांनी स्वत:वर शाप ओढवून घेतला. इतिहास नमूद करितो, की एका पीढीतच रोमी सैन्याने येरुशलेमवर ताबा मिळविला, आणि आज देखील यहूदी जगात सर्वत्र पांगले गेले आहेत.

## ३) जीवित देवासमान मूर्ति घडविणे शापास आमंत्रण देते

''आपल्यासाठी कोरीव मूर्ति करु नको; वर आकाशातील खाली पृथ्वीवरील व पृथ्वीखालच्या जलांतील कशाचीहि प्रतिभा करु नको. त्यांच्या पाया पडू नको किंवा त्यांची पूजा करुं नको; कारण मी परमेश्वर तुझा देव ईर्ष्यावान् देव आहे; जे मजशी विरोध करितात त्यांच्या मुलांस तिसऱ्या चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल शासन करितो.'' (निर्गम २०:४-५).

आम्हाला हे समजते की जे मूर्तिची देवा बरोबर तुलना करितात, ते देवाचे वैरी बनतात. या व्यक्ति निर्लज्यपणे देवाची तुलना तिरस्करणीय अशा साप, माकड आणि हत्ती प्राण्यांशी करतात. जो सर्वसामर्थी प्रभु, देवांचा देव आणि राजांचा राजा, त्याची तुलना नाशवंत अशा गोष्टिंशी करुन, त्याची पावित्र्यहानी करण्याद्वारे जे मूर्तिपुजकांचा न्याय त्यांच्या तिसऱ्या चौथ्या पीढिपर्यंत त्याचा क्रोध ओढवून घेतात.

मला ते विस्तृतपणे सांगू द्या. तुम्ही एकाद्या पुढाऱ्याचा त्याच्या गळ्यात फुलांची माळ घालून सन्मान करु इच्छिता, तर ती माळ माकडाच्या प्रतिबिंबाला घालाल कां? असे केल्यास तुम्ही ज्याचा सन्मान करु इच्छिता निच्छितपणे त्याचा अपमान होणार. कृपया याचा गंभीर विचार करा. बायबल आम्हाला शिकविते. **''यास्तव माझ्या प्रिय बंधूंनो, तुम्ही मूर्तिपूजेपासून दुर पळा.''** (१ करिंथ १०:१४). या दैवी आज्ञेकडे दुर्लक्ष केल्यास निसंशय तुमच्यावर शाप येईल. याचा विचार करा आणि निर्णय घ्या.

## ४) तुम्ही तुमच्या पित्याचा आणि मातेचा सन्मान करण्यास दुर्लक्ष किंवा हयगय केल्यास शाप ओढवून घ्याल.

''आपला बाप व आपली आई यांचा मान राख, म्हणजे जो देश तुझा देव परमेश्वर तुला देत आहे त्यांत तूं चिरकाळ राहशील.'' (निर्गम २०:१२) हे वचन सूचित करते कि; आई-वडिलांचा मान राखण्यास चुकाल, हयगय कराल, तर तुमचे या जगातील तुमच्या आयुष्याचे दिवस कमी होतील देव जेव्हा बोलतो ''आपले'' दिवस वाढतील, ''तेव्हा दर्शवितो कि तो आपल्याला समाधानकारक अर्थव्यवस्था, उत्तम प्रकृति स्वास्थ्य आणि मन:शांति देईल. केवळ याच आशीर्वादांनी आपण खऱ्या आर्थाने दिर्घ आणि भरपूरीचे जीवन जगू शकू.

आजची पीढि त्यांच्या वयस्कर पालकांकडे त्यांची काळजी घेणे महत्त्वाचे आहे याकडे दुर्लक्ष करते त्यांच्याकडे ते आशीर्वाद आहेत या नजरेने पाहण्या ऐवजी ओझे असल्याप्रमाणे पाहतात. अनेक वरिष्ठांना ते सुखसोय असलेल्या ठीकाणी असण्या ऐवजी 'वृद्धाआश्रमात' आहोत असे पाहवयास मिळते. लेकरे आणि पाळक यांच्या मध्ये संघर्ष किंवा विरोध असणे हे काही नवीन नाही, विशेषत आत्मिक बाबतीत पीढी त्याच्या अशिक्षितपणामुळे तरुणांच्या आवडी-निवडी समजुन घेण्यास कमी पडतात मतभेद किंवा अडखळणे यांना न जुमानता-पर्वा न करता त्यांच्या पालकांची सन्मानाने काळजी घेणे, त्यांना प्रेम देणे हि जबाबदारी तरुण पीढीची आहे. हि जबाबदारी टाळल्यामुळे ते त्यांच्या जीवनावरील आशीर्वाद गमावू शकतात.

## ५) देवाच्या मंडळीच्या विरोधात कार्य करणे शापांना आमंत्रण देते:-

**''जर कोणी देवाच्या मंदिराचा नाश करितो तर देव त्याचा नाश करील...''** (१करिंथ ३:१७). **''यहूद्यांस, टेलेण्यांस**


## एको ऑफ हिज कॉल

**मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी**

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.



## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## प्रभु परमेश्वराने आच्छर्यकृत्ये केली!

मी दक्षिण भारतातील ऊटी या शहरातील माझ्या सभेच्या शेवटल्या दिवसाची तयारी करीत असताना मला वेलोर येथील माझ्या मित्राच्या पत्नीचा फोन आला. तीने रडत-रडत मला सांगितले, ''प्रिय बंधु, माझे पति, सॅम्युएल जयसीलम, यांना छातीत असह्य वेदना होत आहेत आणि त्यांना दवाखान्यात ॲडमीट करण्यात आले आहे. त्यांचे हृदयावर एक शस्त्रक्रिया अगोदरच झालेली आहे, आणि दुसरी शस्त्रक्रिया करण्यासाठी ते अतिशय अशक्त आहेत. कृपया वेलोरला ताबडतोब या.''

त्याच रात्री मी वेलोरला जाण्यास निघालो आणि माझ्या मित्राला शस्त्रक्रियेसाठी शस्त्रक्रियागृहात घेऊन चालले असतानाच्या घटकेला दवाखान्यात पोहचलो. अतिशय दु:खीत मनाने मी त्याच्या मस्तकावर हात ठेवून प्रार्थना केली, ''हे प्रभु, माझ्या या मित्राला यावेळेस त्याजवर शस्त्रक्रिया होण्यापासून वाचव. त्याला आच्छर्यकारक रित्या बरे कर.'' उपस्थित डॉक्टराच्या संशयी आणि अपमानास्पद टिके नंतर देखील मी अगदी विश्वासात खंबीर राहिलो. त्याला शस्त्रक्रियागृहात नेई तो पर्यंत त्याच्या आशा सोडलेल्या नातेवाईका सोबत त्याच्या जवळच उभा राहिलो.

शस्त्रक्रियागृहा बाहेर, मी देवावर पूर्ण भरोसा ठेवून आग्रहाने प्रार्थना करीत उभा राहिलो. तासाभरानंतर डॉक्टर शस्त्रक्रियागृहा बाहेर आले, मी त्यांना आतुरतेने विचारिले. ''माझा भाऊ कसा आहे?'' त्याच्या उत्तराने मी चकीत झालो, ते म्हणाले, ''शस्त्रक्रियाचेची गरज नाही. एक कमकुवत झडप आहे, तीच्या साठी औषध उपचार केले जातील.'' देवाने माझ्या प्रार्थनेचे उत्तर, शस्त्रक्रिया न होता त्याला बरे करुन दिले.

देवाची स्तुति असो, जो आपल्या जीवनात अशा प्रकारचे चमत्कार घडवितो.

~~~~~~

---

**व देवाच्या मंडळीसहि अडखळविणारे होऊ नका;''** (१ करिंथ १०:३२).

मंडळीच्या संबंधीत सिद्धांतीक शिक्षण गंभीर आणि अर्थपूर्ण असे आहे. संत पौलाने इफिस ५:२६-२७ या वचनात असे लिहिले आहे - **''त्याने वचनरुपी जलस्नानाने शुद्ध करुन पवित्र करावे आणि तिला गौरवयुक्त मंडळी अशी आपणास सादर करावी, म्हणजे तिला डाग, सुरकुती किंवा अशासारखे काही नसून ती पवित्र व निर्दोष असावी.''** याच उद्देशाने ख्रिस्ताने स्वत:स बळी दिले. येशूने स्वत: जाहीर केले - **''...मी आपली मंडळी रचीन व तिच्यापुढे अधोलोकांच्या द्वारांचे चालणार नाही.''** (मत्तय १६:१८). हे प्रभुला त्याच्या मंडळीविषयी असलेले प्रेम सिद्ध करते. जे त्यांने स्वत:च्या वहिलेल्या रक्ताच्या किंमती द्वारे स्पष्ट केले. त्यामुळे हे स्पष्ट आहे; कि मंडळीचा नाश करणाऱ्यांना देव शिक्षा केल्या वाचून राहणार नाही.

परंतु काहि जण देवाच्या मंडळी विषयी वाईट बोलतात, काहि मंडळीची मालमत्ता लूटतात आणि काहिजण मंडळीचे सिद्धांत कमी लेखतात आणि कठोर अशी टिका करितात असे काहि देवाची लेकरे आहेत. जे आत्म्यांचे तारण व्हावे यासाठी खप श्रम घेऊन कार्य करितात. परंतु काही दुष्ट व्यक्ति त्यांच्या मंडळीत प्रवेश करीतात, नवीन विश्वासणाऱ्यांना गोंधळात पाडतात, आणि त्यांना स्वत:ची मंडळी स्थापण्याकरिता त्यांना मंडळी पासून दुर करितात. असे लोक देवाची सेवा करीत नसतात, तर उलट ते आत्म्यांना बिघडवितात. काही लोक प्रसिद्धि प्राप्त करण्याकरिता त्यांच्या मंडळी बाबतीत खोटी माहिती पसरविण्यास मागे पुढे पाहात नाहित. देव अशा उपहास करणाऱ्यांचे सहन करणार नाहि. तो त्यांना स्पष्टपणे म्हणेल. **''...माझी तुमची कधीच ओळख नव्हती; अहो अधर्म करणाऱ्यांनो, मजपुढून निघून जा.''** (मत्तय ७:२३) हे किती तरी निर्दयी असणार!

याप्रमाणे देव जो कोणी त्यांच्या मंडळीला आणि त्याने त्याच्या सेवेकरिता पाचारण केलेल्या अभिषिक्त सेवकास विरोध करितो त्याला शिक्षा करितो. ती शिक्षा जीवनभर राहाते, आणि शाप एका पिढीपासून पुढच्या पीढीकडे जातो. हे सत्य जगीक आणि बायबलच्या इतिहासात सिद्ध झालेले आहे.
~~~~~~

**या संबंधित कांही उदाहरणे :-**

१) गेहजी हा अलीशा संदेष्ट्याचा चाकर होता. अलीशा अरामी सेनेच्या सेनापति नामान यास त्याच्या कोडापासून बरे करण्यास कारणीभूत होता. तथापी, गेहजीने त्याच्या स्वामीच्या इच्छेच्या विरुद्ध नामानाकडून भेट स्विकारून त्याला फसविल्यामुळे त्याला शाप लागला आणि तो कोडी बनला आणि त्याला देवाच्या उपस्थितीपासून दूर व्हावे लागले. त्याचा शाप त्याच्या संतानाला देखील लागला. हि घटना २ राजे ५:२०-२७ या शास्त्रभागात नमूद करण्यात आली आहे.

२) हनन्या आणि त्याची पत्नी सप्पीरा यांनी त्यांची मालमत्ता देवाच्या सेवाकार्याकरिता विकली. तथापी पेत्रा पासून सत्य लपवून ठेविल्या त्यांना तत्काळ मृत्यु आला. (प्रे.कृ.षः १-१०)

देवाने व्यक्तिंवर, राज्यकारभारावर आणि राज्यांवर देखील, ज्यांनी त्याच्या मंडळीच्या विरोधात आणि त्याच्या दासांच्या विरोधात कृति केली अशांवर नाश आणला. जे देवाच्या खऱ्या सेवकांना ज्यांना त्याने त्यांच्या कळपाचे काळजी घेण्यासाठी पाचारण केलेले आहे. त्यांना इजा करितात, पीडीतात त्यांना त्याच्या शिक्षेला सामोरे जावे लागणार.

माझ्या सेवा कार्यातील काळ मी हे प्रत्यक्षात पाहिलेले आहे, माझ्या सेवेच्या सुरुवातीच्या दिवसात काहि विशिष्ट लोक मला महत्त्व प्राप्त होऊ न देण्याच्या उद्देशाने माझ्या शासकीय कार्यालयात आले आणि माझ्या वरिष्ठांशी मजविरुद्ध असमर्थनिय असे आरोप केले आणि वाईट बोलले. माझ्याकडे बोट दाखवून मला दुःख होईल अशा रितीने मजविरुद्ध आणि माझ्या सेवे विरुद्ध खोट्या गोष्टि पसरवू लागले. तथापी, देव माझ्या बाजूने उभा राहिला आणि त्यांचा अधापात घडवून आणिला. त्यांच्या पैकी कांही रस्त्यांवर वेड्यासारखे फिरत आहेत; काही नाशाच्या कारणात सापडे आहेत आणि त्याचे संतानातील अनेक अपंगत्वाने पीडीत आहेत.

नुकतेच, आमच्या उपासना मंदिराच्या जवळ राहणाऱ्या व्यक्तिंनी शांतताभंग करण्याचा आणि मला मानसिक यातना देण्याचा प्रयत्न केला, काहींनी तर शारिरीक हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

त्यांना मी माझे वाहन मंदिराच्या समोर उभे केलेले पाहावले नाही. त्यांच्या विघातक वर्तणूकीमुळे, मला देवाच्या कार्यासाठी वापरत असलेली मिनीबस अतिशय कमी किंमतीत विकावी लागली. तथापी त्या व्यक्तिंना जुनाट आजाराने ग्रासले आणि त्यांचा लवकरच मृत्यु झाला काहिंना त्यांच्या कुटुंबात अंतर्गत तीव्र भांडण उत्पन्न झाल्यामुळे घर सोडून इतरत्र जावे लागले. मोठ्या एकत्रीत कुटुंबातील सदस्यांना असंख्य आवाहने आणि अडथळ्यांना सामोरे जावे लागल्यामुे त्यांच्या मालमत्ता कमी किंमतीत विकून विभागातून निघून जावे लागले. एके समयी एकत्रीत असलेल्या कुटुंबाला शहरातील वेगवेगळ्या भागात पांगावे लागले. परिणामी, आता आमच्या सेवा कार्याला येथे कोणताहि विरोध होत नाही. याला कोण जबाबदार आहे; आणि मुख्य कारण काय आहे?

**कृपया यावर विचार करा :-**

## 7 शापातून आशीर्वादात स्थित्यंतर होण्यासाठी सात आज्ञा :-

१) ख्रिस्त येशूमध्ये तुमचा विश्वास कबूल करा आणि त्याने तुमच्याकरिता केलेला त्याग मान्य करा.

२) पच्छाताप करा; तुमचे हट्टी, दुराग्रही आणि पापमय मार्ग यांचा त्याग करा. त्यापासून दूर व्हा.

३) तुमच्या विरुद्ध वागलेल्यांना क्षमा करा.

४) सैतानी परिणाम घडवून आणणाऱ्या गोष्टिंपासून आणि मूर्तिपूजेत सहभागी होण्यापासून स्वतःस पूर्णतया दूर ठेवा.

५) येशू ख्रिस्ताने देवू केलेल्या क्षमेवर भरोसा ठेवा आणि त्याजवर संपूर्णपणे विसंबून राहा. त्याच्या रक्ताद्वारे क्षमा आणि मुक्तता मिळविण्याचा प्रयत्न करा.

६) आत्म्यात आणि खरेपणाने आराधना होत असलेल्या मंडळीच्या उपासनांमध्ये उपस्थित राहा. तुमच्या घरा जवळ असलेली मंडळी निवडा. येशू ख्रिस्ताशी जोडलेले असा आणि मंडळी व पाळकांशी गुंतलेले असा.

७) नियमित बायबल वाचन आणि प्रार्थना यांच्या द्वारे वेगवेगळ्या मार्गांनी प्रभु येशू ख्रिस्ताची सेवा करा.

**********

## वाचकांनो लक्ष द्या!

### पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांची आत्मचरित्र

पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांच्या आत्मचरित्र पुस्तक स्वरूपात छापण्याच्या अंतिम टप्प्यात आहोत. **त्यांच्या सेवेचा तुमच्या जीवनावर कसा प्रभाव पडला याविषयी आम्ही तुमच्याकडून दहा ओळींची साक्ष अपेक्षित आहोत. त्यासोबत आत्मचरित्रात तुमचा फोटो छापण्यात आम्हाला आवडेल.**

**- संपादक**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**

**Please subscribe**

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.

**- Editor**

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-   आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th SEPTEMBER 2024**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

## *JESUS LOVES YOU!*

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**